N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर **P.S.(ठाणे):** हडपसर **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0687 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 26/08/2021 20:12 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 11/02/2021

**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 11/02/2021

**Time From (वेळेपासून):** 11:07 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 11:34 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 26/08/2021 **Time (वेळ):** 19:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 032 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 26/08/2021 19:30 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 6 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तलाठी कार्यालय-फुरसुंगीताहवेल

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** digamber bhawani shinde

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 01/06/1965 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | pune,लष्कर ,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | pune,लष्कर ,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री नामदेव पुर्ण नाव व पत्ता माहित नाही | | | 1. पुर्ण नाव व पत्ता माहित नाही,हडपसर, पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

श्री. अनिकेत प्रदीप तिवारी,वय 31 वर्षे,धंदा-व्यवसाय(व्ही टी आय प्रशिक्षण केंद्र,पुणे)
रा.प्लॉट नंबर 94,सुरज हॉस्पीटलच्या पाठीमागे,महादेवनगर, मांजरी, पुणेमोबाईल 9028312878

मी वरीलप्रमाणे असुन वरील नमूद ठिकाणी कुटंुबासह रहावयास आहे.मी दिनांक 10/02/2021 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे येथे समक्ष हजर राहुन श्री श्रीहरी पाटील, पोलीस उपअधिक्षक यांना मी माझी तोंडी तक्रार सांगीतली. ती तक्रार लाच मागणीच्या अनुसंगाने असल्याने त्यावरुन त्यानी त्याचे कक्षात पोलीस निरीक्षक श्रीमती अडनाईकयांना बोलावुन घेतले व त्याचेशी माझी ओळख करुन दिली. त्यानंतर मी पोलीस निरीक्षक श्रीमती अडनाईक यांचे कक्षात जावुन त्यांना माझी तक्रार लेखी दिली ती पुढील प्रमाणे की,-" मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहणेस असुन माझी आई छाया तिवारी हिचे नावावर मौजे फुरसुंगी येथे सर्वे नंबर 138,हिस्सा नंबर 3(जुना सर्वे नंबर 114) ही जागा दि. 08/08/2017 रोजी 2000 स्के फुट जमिन खरेदी केलेली आहे. नमुद खरेदी जमिनीची नोंद सात बारा उतारेवर व फेरफार वर होण्यासाठी मी दिनांक 08/02/2021 रोजी फुरसंगी तलाठी कार्यालय,फुरसंगी ता.हवेली,जि.पुणे येथे गेलो असता सदर ठिकाणी मला एक इसम भेटला त्यांने त्याचे नाव श्री नामदेव असल्याचे सांगितले. त्यावेळी त्यांनी माझी कागदपत्रे पाहुण माझे आईचे नाव फेरफार उतारेवर लावणेसाठी फुंरसुगी तलाठी कार्यालयातील श्री.नामदेव याने मला 10,000/- रुपये प्रति गुंठा प्रमाणे 20,000/- रुपयांची पैश्याची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना इतकी रक्कम कशी लागते असे विचारले असता त्यांनी मला पुढे पैशे दयावे लागतात म्हणुन सांगितले. सदर कामासाठी 20,000/- रुपये दिनांक. 11/02/2021 रोजी घेवुन मला बोलाविले आहे. परंतु नमुद रक्कम ही लाच रक्कम असल्याने ती रक्कम देण्याची माझी इच्छा नाही. तसेच श्री नामदेव व माझेत कोणताही पुर्वीचा आर्थिक व्यवहार अथवा पुर्ववैमनस्य नाही.

तरी माझी आई छाया तिवारी हिचे नावावर मौजे फुरसुंगी येथे सर्वे नंबर 138,हिस्सा नंबर 3(जुना सर्वे नंबर 114) ही जागा दि. 08/08/2017 रोजी 2000 स्के फुट जमिन खरेदी केलेली आहे. नमुद खरेदी जमिनीची नोंद सात बारा उतारेवर व फेरफार वर घेण्यासाठी श्री नामदेव फुरसंगी तलाठी कार्यालय,ता.हवेली,जि.पुणे यांनी माझेकडे 20,000/- रुपये लाच रक्कम मागितली आहे.ती रक्कम दि. 11/02/2021 रोजी घेवुन मला बोलाविले आहे. सदरची रक्कम मी नाही दिल्यास, ते माझ्या आईचे फेरफार उतारेवर नोंद घेणार नाहीत अशी माझी खात्री झाली आहे.तरी त्यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे."अशी लेखी तक्रार दिली. माझे नमुद तक्रारीवरुन मला दि. 11/02/2021 रोजी फुरसंगी तलाठी कार्यालयात भेटलेले श्री नामदेव यांनी लाच रक्कम घेऊन बोलाविले असल्याने पो.नि.अडनाईक यांनी पडताळणी/सापळा पथक व दोन शासकीय पंच उपलब्ध करुन घेतले. दिनांक 11/02/2021 रोजी 10.30 वाजता आकाश लॉन्स,हडपसर सोलापुर रोड,मांजरी,पुणे येथे येण्यास मला सांगितले. त्यावरुन दिनांक 11/02/2021 रोजी पो.नि.श्रीमती अडनाईक,सापळा पथक व दोन पंच असे आकाश लॉन्स,हडपसर सोलापुर रोड,मांजरी,पुणे जवळ आले व त्यानी मला माझे वाहन त्याचे वाहनाचे पाठोपाठ घेण्यास सांगितले.

त्यावरुन आम्ही सर्वजण वॅारियर्स क्रिकेट मैदानाचे बाजुने फुरसंगीकडे जाणारे सार्वजनीक रोड लगत आलो. त्यानंतर पंच,सापळा पथक यांनी ओळख करुन दिली तसेच मी ही माझी ओळख करुन दिली. त्यावेळी दोन्ही पंच व सापळा पथकासमोर मी माझी तक्रार कथन केली.मी कथन केलेली तक्रार व दि.10/02/2021 रोजी दिलेली लेखी तक्रार एकच असल्याची खात्री झाली त्या तक्रारीवर दोन्ही पंचानी व पो.नि.श्रीमती अडनाईक यांनी स्वाक्षरी केली. माझे तक्रारीवरुन पंचासह लाचे संदर्भात पडताळणी करण्याचे ठरले.त्यानंतर माझे व पंचाचे निवेदन घेवुन पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या.त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालू करून माझे बनीयनचे आतील भागात कोणासही दिसणार नाही अशा पद्धतीने लावण्यात आला. पंच क्र. 1 श्री राठोडव मी माझे मोटार सायकल क्रमांक एमएच 50 पी 8988 वरुन फुरसंगी तलाठी कार्यालय,फुरसंगी,ता.हवेली,जि.पुणेयेथे 11.07 वा रवाना केलेव सर्व सापळा वॅारियर्स क्रिकेट मैदानाचे बाजुने फुरसंगीकडे जाणारे सार्वजनीक रोड लगत,फुरसंगीयेथे थांबुन राहिले.
त्यानंतर 11.34 वा. चे सुमारासमी व पंच नं.1 श्री.राठोड असे वॅारियर्स क्रिकेट मैदानाचे बाजुने फुरसंगीकडे जाणारे सार्वजनीक रोड लगत, फुरसंगी येथे आलो.त्यावेळी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला.पोलीस निरीक्षक श्रीमती अडनाईक यांनी पंचा समक्ष मला विचारले की, पडताळणीसाठी गेल्या पासुन येई पर्यंत काय झाले.त्यावेळी मी सांगीतले की,''मी व पंच नं.1 असे तलाठी कार्यालय, फुरसुंगी येथे गेलो कार्यालयामध्ये श्री.नामदेव हे हजर होते तेव्हा थोडयावेळाने श्री.नामेदव हे मला कार्यालयाचे बाहेर बाजुस घेवुन आले तेव्हा त्यांना मी कामाचे काय करायचे असे म्हणालो असता ते म्हणाले की,य " आम्ही उलट तुम्हाला, इथं दुसर दोन दोन गुंठ म्हणल ना, वीस हजाराच्या खाली घेत नाही, पण आपल्याला काय, दोन तीन हजाराशी मिळण्याशी मतलब, दोन गुंठे घेतले, वीस हजारानीच घेतले" असे म्हणाले व नंतर सदरची रक्कम मला पुढं दोघं◌ाला दयायच्यात असे म्हणाले तेव्हा आता किती रक्कम देयची असे मी त्यांना विचारले असता त्यांनी आता 80 टक्के रक्कम देयची म्हणजे थोडक्यात पंधरा, चौदा दयायचे असे म्हणाले व नंतर आठ दहा दिवसांनी किंवा पंधरा दिवसांनी राहिलेले देवुन टाकायचं असे म्हणाले.त्यानंतर मी आपण थांबलो ठिकाणी परत आलो."त्यावरून फुरसंगी तलाठी कार्यालयातील श्री नामदेव यांनी माझी आईचे नावे असलेल्या दोन गुंठे जमीनीची नोंद फेरफार उतारेवर लावण्यासाठी माझेकडे तडजोडीअंती 18,000/- रु. लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. सदर पडताळणी मध्ये फुरसंगी तलाठी कार्यालयातील श्री नामदेव यांनी माझेकडे मागितलेल्या लाच रकमेस तलाठी सुतार यांची संमती आहे का हे पाहण्यासाठी दि.16/02/2021 रोजी पडताळणी करण्याचे ठरले. त्यावरुन दि.16/02/2021 रोजी श्री नामदेव यास मी फोन केला त्यावेळी त्यानी मला दि.17/02/2021 रोजी येण्यास सांगितले. त्यावरुन दि.17/02/2021 रोजी तलाठी सुतार याची सहमती आहे अगर कसे याबाबत पडताळणी करण्याचे ठरले. त्यावरुन दि.17/02/2021 रोजी पुन्हा पडताळणी कारवाई करण्यात आली. त्यामध्ये फुरसंगी तलाठी कार्यालयात तलाठी सुतार हे मिळुन आले नाहीत. तेथे श्री नामदेव मिळुन आले त्यांनी माझी आईचे नावे असलेल्या दोन गुंठे जमीनीची नोंद फेरफार उतारेवर लावण्यासाठी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. व एक तासानी भेकराईत भेटु असे श्री नामदेव यांनी सांगितले होते. नामदेव यांचा फोन न आल्याने दि.17/02/2021 रोजीची पडताळणी कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आलेली होती.
त्यानंतरकोरोनाचा प्रसार वाढल्याने फुरसंगी तलाठी कार्यालय बंद असल्याने पुढील कारवाईसाठी थांबण्यास मी सांगितले होते. तसेच मी ही बाहेरगावी कामानिमीत्त असल्याने येऊ शकलो नाही. त्यानंतर मी दोन तीन वेळा फुरसंगी तलाठी कार्यालयात जाऊन आलो,परंतु तेथे मला श्री नामदेव भेटले नाहीत.तसेच सदर कामाबाबत मी तलाठी सुतार यांनाही भेटलो परंतु त्यानी माझेकडे कोणतीही लाच रक्कम मागितली नाही. तसेचअदयापपर्यंत श्री नामदेव यांनी माझेकडे संपर्क साधुन किंवा भेटुन पैश्याची मागणी केली नाही.तसेचमाझ्या दि.10/02/2021 रोजीच्या तक्रारीत सध्या व भविष्यात पैसे स्विकारण्याची शक्यता नाही अशी माझी खात्री झाली आहे.
एकंदरीत दि.10/02/2021 रोजीच्या माझ्या तक्रारीच्या अनुषंगाने पंचासमक्ष करण्यात आलेली लाचेची पडताळणी कारवाई दरम्यान घडलेल्या घटना तसेच प्रत्यक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडुन ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण यावरूनमाझी आई छाया तिवारी हिचे नावावर मौजे फुरसुंगी येथे सर्वे नंबर 138,हिस्सा नंबर 3(जुना सर्वे नंबर 114) ही जागा दि.08/08/2017 रोजी 2000 स्के फुट जमिन खरेदी केलेली आहे. नमुद खरेदी जमिनीची नोंद सात बारा उतारेवर व फेरफार वर घेण्यासाठी म्हणुन माझेवर वैयक्तीक प्रभाव पाडुन,खाजगी इसम श्री नामदेव यांनी फुरसंगी तलाठी कार्यालय,ता.हवेली,जि.पूणे येथेदि.11/02/2021 रोजी 11.07 ते 11.34 वा. दरम्यान तडजोडीअंती18,000/- हजार रुपयाची लाचेची मागणी करुन गुन्हेगारी स्वरूपाचे कृत्य केले आहे.म्हणून माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.
माझी वरील फिर्याद माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आली असून ती मी वाचून पाहिली असून माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): digamber bhawani shinde
**Rank** (पद): I (Inspector)

**No.**(क्र.): DGPDBSM6504 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

ठाणे अंमलदार

**Name**(नाव): Balkrushna Sitaram Kadam

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): 123

सदरची FIR प्रत, मिळाली